


*माईर्स एमआयटी, पुणे कॅड कॅम नियोजन प्रशिक्षण केंद्र आयोजित कॅड कॅम निबंध सादरीकरणाच्या राष्ट्रीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्वलन करताना डावीकडून प्रा.पाठक, प्रा.एस.जे.भिडे, दीपक शिकारपूर, सुरेद्र अगरवाल, प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड.*

## संगणकीय क्षेत्राला उज्जवल भविष्य

संगणकाच्या सहाय्याने नियोजन व उत्पादन करण्याच्या म्हणजेच कॅड कॅम क्षेत्रातील तंत्राला भविष्यकाळात अंत्यत महत्व देणार असून युवकांनी त्यात

झोकून देऊन काम करावे. असे उद्‌गार नील सॉक्ट कपंनीचे संचालक व प्रसिध्द संगणक तज्ञ सुरेंद अगरवाल यांनी काढले.

माईर्स एमआयटी, पुणे कॅड कॅम नियोजन प्रशिक्षण केंद्र आयोजित कॅड कॅम निबंध सादकरीकरण राष्ट्रीय स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून हे बोलत होत. अध्यक्षपदी दीपक शिकारपूर हे होते.

ते म्हणाले की, सध्याचे जग हे इंटरनेटचे जग आहे. त्यामुळे पूर्व पश्चिमेचा संगम घडत चालला आहे. आपण पश्चिमेकडील चांगल्या गोष्टीचाच स्वीकार केला पाहिजे व आपला आत्मा त्यात ओतला पाहिजे. संगणक हा त्यापैकीच एक होय. त्याचबरोबर संगणक शिक्षणाच्या क्षेत्रात उद्योग आणि शिक्षण संस्था यांचे सहकार्य आवश्यक आहे. अलीकडच्या काळाच माहिती तंत्रज्ञानाच्या वाढीचा वेग कमी झाला आहे. परंतू एमआयटी या संस्थेने हाती घेतलेले अभ्यासक्रम उद्योग क्षेत्रात विकास पावणारे आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या निर्यातीमुळे आपल्या देशात मोठी क्रांती होत आहे. हे तर उघडचे आहे. भारतीय अभियंत्यांचा उच्च असून ते जगाला मोठे योगदान देऊ शकतात. परंतू त्यांनी संशोधन व विकासासारख्या कार्यात सतत अद्यायवात राहिले पाहिजे.